अती महत्वाचे

# University of Mumbai

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email :supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/2019-20/AISHE/107of 2020**

परिपत्रक :-

**विषय : अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) शैक्षणिक वर्ष २०१९-२० ऑनलाईन माहिती भरणेबाबत.**

**संदर्भ : क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१९-२०/१६५८९, दिनांक ३०/१२/२०१९.**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाकडे लक्ष वेधू इच्छितो की,

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व सर्व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता अत्यावश्यक असलेली ऑनलाईन माहिती त्यांनी दिलेल्या www.aishe.gov.in या वेब-पोर्टलवर नोंदविणे अत्यंत गरजेचे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षाकरिता संचालनालयाकडून सुचीत केल्याप्रमाणे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण AISHE कार्यक्रम हा संचालक, मानव संसाधन विकास (MoHRD) नवी दिल्ली, निर्मित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत आपणास विचारण्यात आलेली माहिती ही अत्यंत महत्वपुर्ण व शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी उपयुक्त असल्याने ती आपल्यामार्फत त्वरीत सादर करणे अनिवार्य आहे.

**अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम AISHE :-**

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षाकरीता संचालनालयाकडून खालीलप्रमाणे विचारण्यात आलेली ऑनलाईन पद्धतीनुसार 1) College Institution Form -DCF-II (Attached to University) महाविद्यालये व संस्था यांच्याकडून मागविलेली माहिती, 2) Other Minority Form-DCF-IV- महाविद्यालये व संस्था यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या नोंदणी बाबत व 3) Teachers Information Format- TIF शिक्षकांबाबतची माहिती ही संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या हेतूने व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी, २०२० पर्यंत संचालनालयास विनाविलंब सादर करणे आवश्यक आहे.**

उपरोल्लेखित बाब लक्षात घेता, आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वपुर्ण माहिती ही प्रती शैक्षणिक वर्षानुसार वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार ऑनलाईन स्वरूपात भरणे त्याचप्रमाणे महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहीनिशी परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रा सहीत विद्यापीटास सादर करणे अनिवार्य आहे अन्यथा कोणतीही विद्यापीठीय कार्यालयीन कार्यवाही हमीपत्र/प्रमाणपत्राविना करता येणार नाही, याची दखल घ्यावी.

तसेच महाविद्यालय/संस्था यांनी आपली संबंधित ऑनलाईन स्वरूपातील माहिती बाबतची नोंद न केल्यास त्यांची नावे काळया यादीत (BlackList) दाखविण्यात यावी व विद्यापीठ वेबसाईटवर Highlight करून दर्शविण्यात यावेत, असे आदेश देखील संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे, यांनी दिलेले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

-२-

Scanned by CamScanner

# University of Mumbai

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील ठिकाणानूसार संर्पक साधावा.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Statistical Unit, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022-2261 8987<br>022- 6832 0052 | supt.statunit@gmail.com |
| AISHE Call Centre, Pune | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 020 - 29707093 | stat.dhepune@nic.in |

टिप्पणी :- १. AISHE, MIS व Students on Roll ऑनलाईन माहिती ज्या संबंधित व्यक्तीने भरलेली असल्यास त्यांनी त्या माहिती विषयी पडताळणी करून घेणे व त्यानंरचे एकत्रित स्वरूपातील हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून घेणे अनिवार्य आहे.

२. सर्व स्थरातील AISHE, MIS व Students on Roll ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थी संख्या व इतर माहितीमध्ये कोणतीही तफावत नसावी, ती अचूक असावी, याची नोंद घ्यावी.

३. ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षे २०१९-२० करीता AISHE, MIS व Students on Roll वेबपोर्टलवर नोंदणी (Registration) करून घेतलेली नसल्यास सांख्यिकी कक्षाशी त्वरीत संपर्क साधणे.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २ जानेवारी, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

---

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता रवाना:-

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१,यांच्या माहितीस्तव सादर.
२. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
३. प्र. संचालक, ठाणे उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, ठाणे-४०० ६०८.
४. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
५. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
७. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
८. उपकुलसचिव, पात्रता/नाव नोंदणी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
९. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी-४१५६३९.
१०. सहायक कुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२
११. सहायक कुलसचिव, कल्याण उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, कल्याण.
१२. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
१३. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.

**उपरोल्लेखित विभागीय अधिकारी यांना असे कळविण्यात येते की, AISHE, MIS व Students on Roll बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिवार्य असून सदर माहिती न भरल्यास विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/संस्था यांच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी/पात्रता अर्ज (Enrollment/Eligibility Form), महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) परिक्षा अर्ज (Exam.Form) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत.** तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये. असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात यावी, याची आपण प्रमुख या नात्याने गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

Scanned by CamScanner